# पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.

प्लॉट नं.१, सेक्टर-१५, कोळगाव, पालघर-नवनगर,
जिल्हा-पालघर,दुरध्वनी-०२५२५ २५११००(कार्यालय)
E-mail : sp.palghar@mahapolice.gov.in


क्र.पोअपा/पोलीस भरती-2022-23/आक्षेप/ २३४ /2024 — दिनांक :- ०९ /07/2024

**विषय :-** **पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३**
लेखी परीक्षेच्या बहूपर्यायी उत्तरतालिका आक्षेपाबाबत...

**संदर्भ :-** उमेदवारांनी ई-मेलद्वारे नोंदविलेले आक्षेप...

-----oo-----

वरील विषय व संदर्भास अनुसरुन कळविण्यात येते की, पालघर जिल्हा पोलीस दलामध्ये पोलीस शिपाई व पोलीस शिपाई बॅण्डस्मन पोलीस भरती २०२२-२०२३ प्रक्रियेदरम्यान घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेची **"उत्तरतालिका"** **(Answer Key)** दि.०७.०७.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर बहूपर्यायी उत्तरतालिका संच **"A", "B", "C", व "D"** मधील प्रश्नांचे उत्तरांवर ई-मेलद्वारे उमेदवारांनी हरकती/आक्षेप नोंदविले आहेत.

त्याअनुषंगाने भरती निवड मंडळाने नोंदविलेल्या हरकती / आक्षेपांची विचारपूर्वक तपासणी करुन, साकल्याने विचार करुन व त्याबाबतीत प्रश्नपत्रिका तयार करतांना वापरण्यात आलेली संदर्भ पुस्तके व त्यामधील बिनचूक पर्यायांचा विचारविनीमय करुन दि.०७.०७.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली **"उत्तरतालिका" (Answer Key)** ही अचूक असल्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे सदरची **"उत्तरतालिका" (Answer Key) ही अंतिम असून** तशी सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(बाळासाहेब पाटील)
**अध्यक्ष**
**पोलीस भरती निवड मंडळ तथा**
**पोलीस अधीक्षक, पालघर**

AnyScanner